महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापन करणे, तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी २०१४-१५ या शैक्षणिक वर्षाकरिता परवानगी......

**महाराष्ट्र शासन**

**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**

**शासन निर्णय क्रमांकः एसएफएस-१०१४/प्र.क्र.२०८/एसएम-२**

**हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,**

**मंत्रालय, मुंबई -४०० ०३२**

दिनांक: २५ जून,२०१४

**वाचा**

**शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र. एसएफएस-१११४/प्र.क्र.४०/एसएम-२, दिनांक २६ फेब्रुवारी, २०१४.**

**प्रस्तावना**

महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापन करणे, तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी २०१४-१५ या शैक्षणिक वर्षाकरिता संदर्भाधीन शासन निर्णयान्वये २२१७ संस्थांच्या शाळा पात्र म्हणून घोषित करण्यात आल्या आहेत. तथापि, सदर शासन निर्णयामध्ये पात्र झालेल्या प्रस्तावांपैकी काही प्रस्तावांच्या शाळांच्या बाबतीत त्यांनी मूळ प्रस्तावामध्ये मागणी केल्यानुसार अभ्यासक्रम, शाळांचे माध्यम, प्राथमिक/माध्यमिक/उच्च माध्यमिक वा प्राथमिक ते उच्च माध्यमिक शाळा मंजूर झाल्या नव्हत्या. तसेच अपात्र झालेल्या प्रस्तावांच्या बाबतीत संबंधित संस्थांनी आपल्या निवेदनाव्दारे बाबी शासनाच्या निदर्शनास आणल्या आहेत. संबंधित संस्थांची निवेदने तसेच, क्षेत्रीय कार्यालयाचे अभिप्राय/अहवालाच्या अनुषंगाने दुरुस्त्या व परवानगीबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय**

महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ अंतर्गत सन २०१४-१५ या शैक्षणिक वर्षामध्ये अर्ज केलेल्या संस्थांनी त्रुटींची पूर्तता केल्यामुळे सोबतच्या विवरणपत्र'अ नुसार त्यांना स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापन करण्यास परवानगी देण्यात येत आहे, संदर्भाधीन शासन निर्णय, दिनांक २६ फेब्रुवारी २०१४ अन्वये यापूर्वी उपरोक्त अधिनियमाखाली परवानगी देण्यात आली होती

त्या शासन निर्णयामधील अटी शर्ती या संस्थांनासुध्दा लागू राहतील. संदर्भाधीन शासन निर्णयान्वये मंजूरी दिलेल्या शाळांपैकी विवरणपत्र ‘ब मध्ये दर्शविलेल्या शाळांबाबतीत त्यांच्या समोर दर्शविलेल्या दुरुस्ती/सुधारणा करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

या अधिनियमाखाली शासन परवानगी दिलेल्या संस्थांच्या बाबतीत खालील बाबी शिक्षणाधिकारी यांनी (प्राथमिक/माध्यमिक) स्तरावर खातरजमा करण्यात यावी :-

१) शाळेने प्रस्तावित केलेली जागा/जमीन नियमानुसार किमान १ एकर सलग/अथवा शाळेसाठी योग्य असल्याची संबंधित शिक्षणाधिकारी यांनी खात्री करावी. सदर जागा/जमीन नियमानुसार आढळून न आल्यास संस्थेची मान्यता रद्द करण्याचा प्रस्ताव शासनास सादर करावा.

२) दाननिधी (कायम मुदतठेव) पावती संस्थेच्या नावावर, शाळा मान्यतेचा प्रस्ताव दाखल केल्याच्या दिनांकापासून पुढील ३ वर्षाकरिता असणे आवश्यक आहे. मुदतीनंतर त्याचे नूतनीकरण करण्याबाबत संबंधित, संस्थेची /शाळा व्यवस्थापनाची व शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक) यांची जबाबदारी राहील. अशी कायम मुदतठेवीची मूळ पावती संबंधित शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक) यांचेकडे तारण म्हणून ठेवावी.

२. सदर आदेश सर्व व्यवस्थापन/संस्था यांना १५ दिवसात कळविण्याची जबाबदारी संबंधित सर्व शिक्षण उपसंचालक यांची राहील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१४०६२७१४०२३४३८२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Rajendra Shankarrao Pawar

Digitally signed by Rajendra Shankarrao Pawar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education and Sports, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Rajendra Shankarrao Pawar
Date: 2014.06.27 14:03:30 +05'30'

**(राजेंद्र पवार)**

**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत,

१. आयुक्त, शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे

२. सर्व महानगरपालिकांचे आयुक्त

३. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी

४. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई.

५. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.

६. शिक्षण संचालक, (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.

७. शिक्षण संचालक, (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.

८. विभागांतर्गत सर्व संचालक.

९. सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक.

१०. सर्व जिल्हा परिषदांचे शिक्षणाधिकारी (प्राथमिक / माध्यमिक)

११. सर्व शिक्षण निरीक्षक (पश्चिम / उत्तर / दक्षिण) बृहन्मुंबई.

१२. संबंधित प्रशासन अधिकारी, महानगरपालिका/नगरपरिषदा/नगरपालिका

**प्रत माहितीसाठी अग्रेषित :-**

१. मा. मंत्री (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव.

२. मा.राज्यमंत्री (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव.

३. मा. सचिव (शालेय शिक्षण) यांचे स्वीय सहायक

४. सर्व सहसचिव / उपसचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.

५. निवडनस्ती (एसएम २).

| अ.क्र. | जिल्हा | संस्थेचे नाव व पत्ता | प्रस्तावित शाळेचे नाव व ठिकाण | नवीन शाळा/ दर्जावाढ | प्रकार | माध्यम | छाननी समितीची शिफारस व त्या बाबत प्राप्त झालेल्या हरकती / सूचना / आक्षेप विचारात घेता शासनाचा अंतिम निर्णय |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| २८ | पुणे | जयवंत एज्युकेशन फाऊंडेशन, सणसवाडी, ता.शिरुर, जि.पुणे | जयवंत पब्लिक स्कूल, सणसवाडी, तळेगांव ढमढेरे रोड, ता.शिरुर, जि.पुणे | नवीन शाळा | प्राथमिक | इंग्रजी | पात्र |
| २९ | पुणे | फलक एज्युकेशनल सोसायटी, भाग्योदय नगर, कोंढवा, पुणे | ब्राईट फ्यूचर स्कूल इंग्लिश मिडीयम, स.नं.४६/१४/१३/२ व ४८/२/१ कोंढवा खुर्द | नवीन शाळा | प्राथमिक | इंग्रजी | पात्र |
| ३० | पुणे | ज्ञान विज्ञान आणि व्यक्ती विकास प्रतिष्ठान पुणे, महंमदवाडी रोड, हडपसर, पुणे-२८ | कॅपिटल इंग्लिश मिडीयम स्कूल, होळकरवाडी, ता.हवेली, जि.पुणे | नवीन शाळा | प्राथमिक | इंग्रजी | पात्र |
| ३१ | पुणे | श्री साई संस्कार एज्युकेशनल ट्रस्ट, विकासनगर, किवळे, देहुरोड | विब्स पब्लिक स्कूल, स.नं.४१, आवटे फॅब्रिकेशन जवळ, विकासनगर,किवळे, देहुरोड | नवीन शाळा | प्राथमिक | इंग्रजी | पात्र |
| ३२ | अहमदनगर | अनंत आशा प्रतिष्ठान, पुणे | अंनत आशा इंटरनॅशनल स्कूल, खेड, ता. कर्जत, जि. अहमदनगर | नवीन शाळा | प्राथमिक | इंग्रजी | पात्र |
| ३३ | सोलापूर | निलाई बहुउद्देशिय समाजसेवी संस्था, सौंदरे, ता.बार्शी, जि. सोलापूर | महात्मा फुले प्राथमिक शाळा सौंदरे, ता.बार्शी, जि. सोलापूर | नवीन शाळा | प्राथमिक | मराठी | पात्र |
| ३४ | सोलापूर | शिवनेरी प्रतिष्ठान, सोलापूर | गुटाळ मॉडर्न प्रशाला, पांगरे, ता. करमाळा, जि. सोलापूर | नवीन शाळा | प्राथमिक | इंग्रजी | पात्र |
| ३५ | सोलापूर | ओमसाई बहु. संस्था, विजोरा, ता. वाशी, जि. उस्मानाबाद | सुयश प्राथमिक विद्यालय तांदुळवाडी, ता. बार्शी, जि. सोलापूर | नवीन शाळा | प्राथमिक | मराठी | पात्र |
| ३६ | सोलापूर | श्री.विठ्ठल शि.प्र. मं. जुजारपूर, ता.सांगोला, जि.सोलापूर | आदर्श विद्यामंदिर जुजारपूर, ता. सांगोला, जि. सोलापूर | नवीन शाळा | उच्च प्राथमिक | मराठी | पात्र |
| ३७ | सोलापूर | शिवनेरी प्रतिष्ठान, सोलापूर | गुटाळ मॉर्डन प्रशाला, पांगरे, ता. करमाळा, जि. सोलापूर | नवीन शाळा | उच्च प्राथमिक | मराठी | पात्र |
| ३८ | सोलापूर | जय मल्हार बहु.शै.सा.कला क्रीडा मंडळ करांडेवाडी-बुध्देहाळ, ता. सांगोला, जि. सोलापूर | शांतीनिकेतन उच्च प्राथमिक विद्यालय तिप्पेहळळी, ता. सांगोला, जि. सोलापूर | नवीन | उच्च प्राथमिक | मराठी | पात्र |
| ३९ | कोल्हापूर | श्री आदर्श शिक्षण संस्था,कोथळी,ता.शिरोळ, ता.शिरोळ | आदर्श बालक मंदीर, कोथळी, ता.शिरोळ | नवीन शाळा | प्राथमिक | मराठी | पात्र |
| ४० | कोल्हापूर | स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, २०४ ई, ताराबाई पार्क, कोल्हापूर | न्यु मॉडेल इंग्लिश स्कूल, रेंदाळ, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर | नवीन | प्राथमिक ते उच्च माध्यमिक | इंग्रजी | पात्र |
| ४१ | कोल्हापूर | आनंद शैक्षणिक, सामाजिक संस्था, काळजवडे,ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर | ज्ञानेश्वरी ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्स ॲंड कॉमर्स, बाजारभोगाव, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर | नवीन शाळा | उच्च माध्यमिक | इंग्रजी | पात्र |
| ४२ | सातारा | ज्ञानगंगा शिक्षण संस्था, विद्यानगर, कराड, जि. सातारा | पवार पब्लिक स्कूल, मु.पो. पुसेसावळी, ता. खटाव,जि. सातारा | नवीन शाळा | प्राथमिक | इंग्रजी | पात्र |